# रत्नागिरी नगरपरिषद,रत्नागिरी

## फेर निविदा सूचना सन २०११- १२

रत्नागिरी नगरपरिषदेकडून खाली नमूद केलेल्या कामासाठी योग्य वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून मोहरबंद बाबवार दराची निविदा मागविणेत येत आहे.

कामाची निविदा फॉर्म दिनांक ०३ /१० /११ ते ०५ /१० /११ या मुदतीत कार्यालयीन कामाचे दिवशी सकाळी ११.०० ते सायंकाळी ४.०० या वेळांत नगरपरिषद कार्यालयांत कामकाजाचे वेळी आवश्यक ते शुल्क भरुन मिळतील. निविदा पोस्टाने पाठविल्या जाणार नाहीत.

यथोचितरीत्या भरलेली आणि सर्व दृष्टीने परीपूर्ण निविदा दिनांक ११/१०/११ रोजी दुपारी ३.०० वाजे पर्यत स्विकारणेत येतील व शक्य झाल्यास त्या दिवशी दुपारी ४.०० वाजता कंत्राटदारा समोर अथवा त्यांच्या प्रतिनिधी समोर उघडण्यात येतील. खाली दर्शविल्या प्रमाणे बयाणा रक्कम रोखीने नगरपरिषद कार्यालयांत भरावी लागेल. कंत्राटदारांनी त्यांची निविदा मंजूर झाल्याचे कळविले पासून १० दिवसांचे मुदतीत आवश्यक ते करारपत्र करुन दयावें लागेल तसेच कामाचे अंदाजित रक्कमेच्या पाच टक्के इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून भरावी लागेल.

सशर्त निविदा स्विकारली जाणार नाही. करारनामा लिहून दिल्यानंतर दिलेल्या मुदतीत काम पूर्ण करुन दयावे लागेल. जागेवरील परिस्थिती प्रमाणे मंजूर कामात घट केली गेल्यास त्याबाबत कंत्राटदाराला कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई दिली जाणार नाही. या संबंधी आवश्यक ती माहिती नगर परिषद कार्यालयांत **भांडार विभागात** कार्यालयीन वेळांत मिळू शकेल.

कोणतीही एक निविदा स्विकारण्याचा अथवा कारणाशिवाय सर्वच निविदा नाकारण्याचा अधिकार राखून ठेवणेत येत आहे. निविदा दोन लखोटा पध्दतीने सादर करावयाच्या आहेत.

सदरची निविदा www.ratnagirinagarparishad.org या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

| अ.क्र | कामाचे नांव | कामाची अंदाजित रक्कम | कामाची बयाणा रक्कम | टेंडर फॉर्म किंमत | काम पूर्ण करणेची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| १ | नगर विकास विभाग, शासन निर्णय दि.२८-०७-२००९ प्रमाणे संगणकीकरण करीता डेटा एन्ट्री करणे.<br>अंदाजे ९०००० एन्ट्री ± २५ % | /-<br>Per record दर नमूद करावेत. | १००००/- | १५००/- | १ महिना |

रत्नागिरी नगरपरिषद
दिनांक :- ०१ / १० /२०११

मुख्याधिकारी
रत्नागिरी नगरपरिषद